**विशेष दिवाणी दावा क्र. ४७/२०१९**

**CNR No. MHSO060005622019**

रेश्मा इंगळे तानवडे

वि.

समीर इंगळे तानवडे वगैरे

**संयुक्त आदेश निशाणी क्र. ५ आणि निशाणी क्र. ४५ वर**

प्रस्तुत दावा हा वाटप होऊन मिळणेसाठी तसेच दावा मिळकत क्र. (१) म्हणजे मौजे गणेशवाडी, ता. मंगळवेढा, जि. सोलापूर येथील शेतजमीन गट क्र. १८१ मधील क्षेत्र संपादन झाल्याबाबत प्रतिवादी क्र. १ व २ यांना मिळालेल्या मोबदल्याची रक्कम रु. ०३,३२,०३,९३३/- मधील वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांच्या हिश्याची रक्कम मिळावी यासाठी हा दावा दाखल करण्यात आलेला आहे. त्यामध्ये वादी यांनी निशाणी क्र. ५ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हकूमासाठीचा अर्ज देऊन प्रतिवादी क्र. १ व २ यांना संपादन मोबदल्याच्या मिळालेल्या रकमेपैकी वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांच्या हिश्याची रक्कम या दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत सुरक्षीत ठेवण्यात यावी. तसेच दावा कलम (१) प्रमाणेची मिळकत या दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळावा अशी विनंती केलेली आहे. तसेच प्रतिवादी क्र. ५ यांनी देखील निशाणी क्र. ४५ प्रमाणेचा अर्ज देऊन नमूद संपादनाच्या मोबदल्यामध्ये त्यांचा हक्क व अधिकार आहे. त्यामुळे जमा संपादन रक्कम रु. ०३,३२,०३,९३३/- ही प्रतिवादी क्र. १ यांनी त्यांच्या बँक ऑफ इंडीया, शाखा मंगळवेढा येथील खात्यातून स्वतः अथवा इतरांमार्फत काढू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूम द्यावा ही मागणी केलेली आहे.

प्रकरणातील संक्षीप्त हकीकत पुढीलप्रमाणे आहे –

०२. दावा मिळकत क्र. १ ते ९ या वडिलोपार्जित मिळकती आहेत. विठोबा उर्फ विठ्ठल सोपान तानगावडे यांचे वादी तसेच प्रतिवादी क्र. ३ ते ८ हे वारस आहेत. विठोबा उर्फ विठ्ठल हे दिनांक ०९/०७/२०११ रोजी मयत झालेले आहेत. प्रतिवादी क्र. १ व २ हे प्रतिवादी क्र. ३ महादेव यांची मुले आहेत. एकत्र कुटुंबाच्या उत्पन्नातून विठोबा उर्फ विठ्ठल यांनी दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ ही दिनांक २६/०४/१९५० रोजी खरेदी घेतलेली आहे. त्यानंतर विठोबा उर्फ विठ्ठल यांच्या वृध्दपणाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र. ३ यांच्याशी संगनमताने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नमूद शेतजमीन ही दिनांक १८/०५/२०११ रोजी खरेदी घेतलेली आहे. सदर जमीन ही संपादित झालेली आहे. त्या संपादित जमिनीच्या मिळालेल्या मोबदल्यामध्ये वादी तसेच इतर प्रतिवादी यांचा हक्क आहे. मयत विठोबा उर्फ विठ्ठल यांना एकट्याला सदर दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ ही विक्री करण्याचा कोणताही हक्क व अधिकार नाही. त्यामुळे या दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ चे कोणत्याही प्रकारे हस्तांतर करु नये तसेच संपादन मोबदल्यामधील वादी व प्रतिवादी क्र. ६ ते ८ यांचा हिस्सा तसाच ठेवण्यात यावा यासाठी वादी यांनी निशाणी क्र. ५ प्रमाणे तर प्रतिवादी क्र. ५ यांनी निशाणी क्र. ४५ प्रमाणे संपादनाची जमा रक्कम या दाव्याचा अंतिम निर्णय होईपर्यंत प्रतिवादी क्र. १ यांनी बँकेतून काढू नये असा तुर्तातुर्त मनाई हुकूमाचा अर्ज दिलेला आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ ते ३ हे प्रकरणामध्ये हजर झाले. त्यांनी निशाणी क्र. ३१ प्रमाणे त्यांची कैफियत तर निशाणी क्र. ३३ प्रमाणे तुर्तातुर्त मनाई हुकूमासाठीच्या अर्जावर त्यांचे म्हणणे सादर केलेले आहे. वादी हे स्वच्छ हाताने न्यायालयासमोर आलेले नाहीत. दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ ही मयत विठोबा उर्फ विठ्ठल यांनी सन १९५० साली स्वतःच्या उत्पन्नातून खरेदी केलेली आहे. ते बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडीकेट

लि., श्रीपूर येथे सन १९४८ सालापासून नोकरीस होते. सदर मिळकत ही मयत विठोबा उर्फ विठ्ठल यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. त्यांनी कौटुंबिक अडचणीसाठी ती मिळकत दिनांक १८/०५/२०११ रोजी प्रतिवादी क्र. १ व २ यांना रजिस्टर्ड खरेदीखताआधारे विक्री केलेली आहे. ते हयात असताना विठोबा उर्फ विठ्ठल यांनी अथवा त्यानंतर हा दावा दाखल करेपर्यंत वादी व इतर प्रतिवादी यांनी त्यास कधीही कोणतीही हरकत घेतलेली नाही.

०४. नमूद दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ ही सन २०१६ मध्ये संपादीत करण्यात आलेली आहे. त्याचा मोबदला प्रतिवादी क्र. १ व २ यांना देण्यात आलेला आहे. संपादनाचे वेळी देखील त्यामध्ये हिस्सा आहे याबाबत कोणतीही तक्रार वादी अथवा उर्वरीत प्रतिवादी यांनी केलेली नाही. प्रतिवादी क्र. १ व २ हे दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ चे खरेदीखताआधारे मालक झालेले आहेत. त्यामुळे क्षेत्र संपादीत झाल्याबाबत मिळालेल्या मोबदल्यामध्ये वादी अथवा इतर उर्वरीत प्रतिवादी यांचा कोणताही संबंध नाही असे त्यांनी नमूद केलेले आहे.

०५. वादी यांचे वकील श्री. के. एम. घाडगे, प्रतिवादी क्र. १ ते ३ यांचे वकील श्री. एम. एस. बडोदकर तसेच प्रतिवादी क्र. ५ यांचे वकील श्री. एस. जी. माने यांचा युक्तिवाद ऐकला. रेकॉर्डवरील दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. या दोनही अर्जांच्या अंतिम व योग्य निर्णयासाठी मी पुढीलप्रमाणे मुद्दे निश्चित केले. त्यावरील माझे उत्तर मी पुढील कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| | <u>मुददे</u> | | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|---|
| १. | वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ यांना प्रथमदर्शनी केस आहे काय ? | ... | नाही. |
| २. | न्यायाचा समतोल वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ यांच्या बाजूने आहे काय ? | ... | नाही. |

| | | | |
|---|---|---|---|
| ३. | नमूद तुर्तातुर्त मनाई न दिल्यास वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ यांचे अपरिमित नुकसान होईल काय ? | ... | नाही. |
| ४. | अंतिम आदेश कोणता ? | ... | अर्ज नामंजूर करण्यात येत आहे. |

## <u>का र ण मि मां सा</u>

**<u>मुद्दा क्र. १ बाबत</u>**

०६. वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकतपैकी मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ ही वडिलोपार्जित मिळकत आहे. वादी आणि प्रतिवादी क्र. ६ ते ८ हे विठोबा उर्फ विठ्ठल यांचा मयत मुलगा भालचंद्र यांचे वारस आहेत. तर प्रतिवादी क्र. ३ महादेव, प्रतिवादी क्र. ४ सिताराम व प्रतिवादी क्र. ५ सुभाबाई हे मयत विठोबा उर्फ विठ्ठल यांची मुले आहेत. वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ यांच्या कथनाप्रमाणे दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ ही त्यांची वडिलोपार्जित मिळकत आहे.

०७. दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ ही विठोबा उर्फ विठ्ठल यांनी दिनांक २६/०४/१९५० रोजी खरेदी केलेली आहे. त्यामध्ये विठोबा उर्फ विठ्ठल यांचा व्यवसाय शेती असा दर्शवण्यात आलेला आहे. वडिलोपार्जित शेती या व्यवसायातील उत्पन्नातून विठोबा उर्फ विठ्ठल यांनी सदर जमीन खरेदी घेतलेली आहे. त्यामुळे त्या जमिनीमध्ये विठोबा उर्फ विठ्ठल यांच्या वारसांचा हक्क व हितसंबंध आहे. त्यांच्या संमतीशिवाय विठोबा उर्फ विठ्ठल यांना सदर विक्री करता येणार नाही. विठोबा उर्फ विठ्ठल यांच्या वृध्दपणाचा गैरफायदा घेऊन प्रतिवादी क्र. ३ यांचेशी संगनमताने प्रतिवादी क्र. १ व २ यांनी दिनांक १८/०५/२०११ रोजी सदर जमीन खरेदी घेतलेली आहे. त्यामुळे त्या जमिनीपैकी संपादीत क्षेत्राच्या मिळालेल्या मोबदल्यामध्ये वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांचा हक्क व हितसंबंध आहे असे वादी व प्रतिवादी क्र. ५ यांनी प्रतिपादन केले आहे.

०८. प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी निशाणी क्र. ३१ प्रमाणे त्यांची कैफियत दिलेली आहे. त्यांनी दाखल केलेल्या कागदपत्रांनुसार मयत विठोबा उर्फ विठ्ठल हे बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडीकेट लि., श्रीपूर येथे सन १९४८ सालापासून नोकरीस होते. त्या नोकरीच्या उत्पन्नातून त्यांनी प्रस्तुत गट क्र. १८१ ही जमीन खरेदी केलेली आहे. त्यानंतर विठोबा उर्फ विठ्ठल यांनी औषधोपचार व इतर गरजांसाठी स्वतःच्या मर्जीने ती जमीन प्रतिवादी क्र. १ व २ यांना विक्री केलेली आहे. त्यास हयात असेपर्यंत विठोबा उर्फ विठ्ठल यांनी व त्यानंतर त्यांचे वारस यांनी हा दावा दाखल करेपर्यंत कधीही कोणत्याही प्रकारे हरकत घेतलेली नाही. त्यानंतर सन २०१६ मध्ये त्या मिळकतीपैकी काही क्षेत्र संपादीत करण्यात आलेले आहे. त्या संपादनाच्या मोबदल्याची मोठी रक्कम मिळावी यासाठी खोटेपणाने हा दावा व प्रस्तुत अर्ज दाखल करण्यात आलेला आहे असे प्रतिवादी क्र. १ ते ३ यांनी सांगितले.

०९. प्रतिवादी क्र. ३ यांची प्रतिवादी क्र. १ व २ ही मुले आहेत. रेकॉर्डवर दाखल कागदपत्रांचे आधारे मयत विठोबा उर्फ विठ्ठल हे नोकरीस होते. त्यांना स्वतःचे उत्पन्नाचे साधन होते. दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ ही त्यांनी खरेदी केलेली आहे. त्यावेळी त्यांना दरमहा ४५/– रुपये पगार होता. तसेच प्रतिवादी क्र. १ व २ यांना त्यांनी दिनांक १८/०५/२०११ रोजी रजिस्टर्ड खरेदीखत करुन दिलेले आहे. त्यानंतर सन २०१५ पर्यंत वादी यांचे पती भालचंद्र हे हयात होते. त्यांनी अथवा प्रतिवादी क्र. ५ यांनी त्याबाबत कधीही तक्रार केलेली दिसून येत नाही. नमूद मिळकतीचे संपादन सन २०१६ मध्ये झाले. त्यावेळी देखील वादी अथवा प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी कोणतीही तक्रार केल्याचे दिसत नाही. संपादन मोबदल्याची रक्कम मिळाल्यानंतर आता वादी यांनी तक्रार केल्याचे दिसून येत आहे.

१०. प्रथमदर्शनी मयत विठोबा उर्फ विठ्ठल हे नोकरीस होते. त्यांनी स्वतः सदर मिळकत ही दिनांक २६/०४/१९५० रोजी खरेदी घेतालेली आहे. त्यानंतर रजिस्टर्ड खरेदीखताआधारे ती मिळकत प्रतिवादी क्र. १ व २ यांना विक्री केलेली आहे असे दिसून येते. त्यामुळे प्रथमदर्शनी नमूद मिळकत ही विठोबा उर्फ विठ्ठल यांची स्वतःचे मालकीची

मिळकत होती व ती विक्री करण्याचा त्यांना अधिकार आहे असे दिसून येते. हयात असताना विठोबा उर्फ विठ्ठल यांनी तसेच सन २०११ नंतर हा दावा दाखल करेपर्यंत वादी अथवा प्रतिवादी क्र. ५ यांनी सदर व्यवहारास कोणतीही हरकत घेतलेली नाही. सबब नमूद चर्चेनुसार वादी व प्रतिवादी क्र. ५ यांना प्रथमदर्शनी केस नाही असा निष्कर्ष मी नोंदवत आहे. त्यानुसार मी मुद्दा क्र. १ चे उत्तर 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. २ बाबत</u>** –

११. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी नमूद दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ ही दिनांक १८/०५/२०११ रोजी खरेदी केलेली आहे. त्यानंतर सदर मिळकतमधील काही भाग संपादीत करण्यात आला. तो पर्यत वादी अथवा प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांनी कोणतीही हरकत घेतल्याचे दिसून येत नाही. परंतु संपादित क्षेत्राचा मोबदला मिळाल्यानंतर उशिराने आता त्यामध्ये आपला हक्क असल्याचे प्रतिपादन वादी व प्रतिवादी क्र. ५ हे करत आहेत. प्रथमदर्शनी नमूद दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ ही मयत विठोबा उर्फ विठ्ठल यांची स्वकष्टार्जित मिळकत आहे. त्यांनी त्यांचे हयातीमध्ये त्याची विक्री प्रतिवादी क्र. १ व २ यांना रजिस्टर्ड दस्ताआधारे केलेली आहे. त्यास मुदतीत आक्षेप घेण्यात आलेला नाही. त्यामुळे आता दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ मध्ये अथवा संपादन मोबदल्यामध्ये वादी अथवा प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांचा हक्क व हितसंबंध शिल्लक राहिलेला नाही असे प्रथमदर्शनी दिसून येते. सबब सदर रक्कम विनाकारण अडकवून ठेवणे न्यायाचे दृष्टीने योग्य होणार नाही. त्यामुळे न्यायाचा समतोल हा वादी यांचे बाजुने नाही. उलट तो प्रतिवादी क्र. १ व २ यांचे बाजुने आहे असे मी नमूद करतो. त्यानुसार मुददा क्र. २ चे उत्तर मी 'नकारार्थी' देत आहे.

**<u>मुद्दा क्र. ३ बाबत</u>** –

१२. संपादनाच्या मोबदला रकमेमध्ये वादी व प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांचा हक्क व हितसंबंध शिल्लक राहिलेला प्रथमदर्शनी दिसून येत नाही. दावा प्रलंबित असताना सदर

रक्कम जरी प्रतिवादी क्र. १ व २ यांना मिळाली व त्यानंतर त्या संपादनाची मोबदला रक्कम अथवा मिळकतमध्ये वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांचा हक्क व हितसंबंध आहे असे निष्पन्न झाले तर वादी व प्रतिवादी क्र. ५ ते ८ हे सदर रक्कम प्रतिवादी क्र. १ व २ यांचेकडून वसूल करु शकतात. प्रथमदर्शनी दावा मिळकत क्र. (१) म्हणजे गट क्र. १८१ मध्ये वादी व प्रतिवादी क्र. ५ ते ८ यांचा कोणताही हक्क अथवा हितसंबंध शिल्लक राहिलेला नाही असे दिसून येते. त्यामुळे तुर्तातुर्त मनाई हुकूम देता येणे शक्य होणार नाही. तर नमूद मनाई हुकूम दिला नाही तर न भरुन येणारे असे कोणतेही अपरिमीत नुकसान वादी अथवा प्रतिवादी क्र. ५ यांचे होणार नाही. सबब मी मुददा क्र. ३ चे उत्तर मी 'नकारार्थी' देतो.

**मुद्दा क्र. ४ बाबत** –

१३. मुददा क्र. १ ते ३ च्या नकारार्थी उत्तरानुसार वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ यांना प्रथमदर्शनी केस नाही. न्यायाचा समतोल वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ यांच्या बाजूने नाही. तसेच जर नमूद तुर्तातुर्त मनाई हुकूम दिला नाही तर वादी तसेच प्रतिवादी क्र. ५ यांचे अपरिमीत नुकसान होणार नाही असे निष्कर्ष मी नोंदवलेले आहेत. त्यामुळे मुददा क्र. ४ च्या उत्तरासाठी मी पुढीलप्रमाणे आदेश देत आहे.

## आ दे श

१. अर्ज निशाणी क्र. ५ व निशाणी क्र. ४५ नामंजूर करण्यात येत आहे.

२. खुल्या न्यायालयात आदेश जाहीर केला.

स्वाक्षरी/–

दि. ०९/०४/२०२१

( श्रीकृष्ण हरीभाऊ इनामदार )
सह दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर, पंढरपूर